तर्फे विश्वस्त................

श्री. अरविंद ओढेकर, गंगापूर रोड

वय ६५ .. धंदा..निवृत्त शिक्षक

रा. नाशिक

पक्ष नं. १

आणि

.........................................

.........................................

.........................................

पक्ष नं. २

कारणे करारनामा लिहून ठेवतो तो ऐसा जे की, ......

१. ज्या अर्थी, पक्ष नं.१ ही संस्था मुंबई सार्वजनिक न्यास कायद्याचे तरतुदीनुसार नोंदणीकृत सार्वजनिक न्यास आहे. पक्ष नंबर १ चे अंगीकृत उद्दीष्टांपैकी, वाचन संस्कृती वाढण्यासाठी प्रयत्न करावेत हे ही एक उद्दीष्ट आहे.

२. आणि ज्या अर्थी पक्ष नं. १ ने आपल्या उपरोलेखीत उद्दीष्टाचे पुर्तीसाठी ग्रंथ वाचकाचे भेटीला योजना राबविण्याचे ठरवले आहे. त्या अंतर्गत प्रत्यक्ष ग्रंथ वाचकास विनामुल्य, वाचण्यास पोहचविण्याची योजना आहे.

३. आणि त्या अर्थी या योजनेतंर्गत, पक्ष नं. २ ने, वाचक व पक्ष नं.१ यांचे दरम्यान माध्यम म्हणून काम करण्याची तयारी दर्शविली.

४. आणि ज्या अर्थी पक्ष नं. १ व २ यांचे दरम्यान सदर योजनेचे उद्दीष्टाबाबत, ती राबविण्याबाबतचे तपशिलवार बोलणी झाली. त्यानुसार दोन्ही पक्ष लिहून हा करार लिहून ठेवित आहेत.

५. पक्ष नं. १ यांनी काही व्यक्तींचे सहकार्याने वाचकांचे वाचनासाठी ग्रंथ खरेदी घेतलेले आहेत. त्या ग्रंथाचे विभाग केले असून त्यापैकी एक-एक विभाग वेगवेगळ्या भागातील वाचकांचे वाचनासाठी पक्ष नं. १ यांना उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. त्याकरीता मध्यस्थ म्हणून काम करण्याचे पक्ष नं. २ यांनी मान्य केले आहे.

६. वाचकांना ग्रंथ वाचनासाठी उपलब्ध करुन देण्याकरिता पक्ष नं. १ ते ग्रंथ पक्ष नं. २ चे ताब्यात देईल. ते ग्रंथ वाचकांना वाचकांसाठी देणे, त्यांचेकडून परत घेणे ही जबाबदारी पक्ष नं. २ यांनी स्विकारली आहे. पक्ष नं. १ कडून दिले जाणारे ग्रंथ पक्ष नं. १ यांना पुन्हा सर्वच्या सर्व, सुस्थितीत देण्याची जबाबदारी पक्ष नं. २ यांनी स्विकारली आहे. ग्रंथ गहाळ झाल्यास अथवा ग्रंथ फाटल्यास त्या ग्रंथाची नवीन छापील किंमत पक्ष नं. १ यांना देण्याचे पक्ष नं. २ यांनी अंगीकारीले आहे.

७. पक्ष नं. २ यांना, त्यांचे वर नमूद केलेल्या कार्यालयात ग्रंथ पोहोच देण्याची जबाबदारी पक्ष नं. १ यांनी स्विकारली आहे. पक्ष नं. १ कडून ग्रंथ पोहोचल्यानंतर ते पुन्हा परत देईपावेतो त्यांचा सांभाळ करणे, वाचकांना त्यांचे वाटप करणे ही जबाबदारी पक्ष नं. २ ची राहील.

८. ठरावीक मुदतीनंतर सर्वच्या सर्व ग्रंथ पक्ष नं. २ कडून परत घेवून त्याऐवजी नवीन ग्रंथ पक्ष नं. १ कडून पक्ष नं. २ यांना दिले जातील.

९. सदरची योजना वाचकांना मोफत वाचन करण्यास मिळावे या उद्देशाने राबविली जाणार आहे. सबब ग्रंथ वाचनास देण्याबद्दल कोणत्याही स्वरुपात मोबदला पक्ष नं. २ यांनी वाचकाकडून तसेच पक्ष नं. १ यांनी पक्ष नं. २ कडून घ्यावयाचा नाही. हा करारनामा.

[signature]

पक्ष नं. १

[signature] 27.02.17

पक्ष नं. २

[illegible]
9422256758

G.M.D. ARTS, B.W. COM. & SCIENCE COLLEGE, Sinnar 422103

[signature]
S.B.Ahire
8275716003

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

ONE HUNDRED RUPEES

रु. 100

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA © 2015 © PP 598058

संमती पत्र

अ. न. 22514 दि. 7 JAN 2017 रु. 100/- पैकी रु. ...........

श्री. / श्रीमती / सौ. कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक

पत्ता गंगापूर रोड नाशिक

हस्ते आदित्य भावे

सही

श्री. स. रा. अमृतकर
स्टॅम्प वेंडर, नाशिक.
(मु. वि. प. क्र. १०३/२००१)

TREASURY

4 JAN 2017

# करारनामा

करारनामा आज दिनांक माहे / /२०१७ ते दिवशी

नाशिक मुक्कामी,

कुसुमाग्रज प्रतिष्ठान,

मुंबई सार्वजनिक न्यास कायद्यानुसार

नोंदविलेली संस्था मुख्य कार्यालय,

टिळकवाडी, नाशिक